## प्रेसनोट

### जबरीची चोरी करून ट्रकचालकास लुटून ट्रक चोरणारे गुन्हेगार युनिट-२ च्या पथकाकडुन जेरबंद

पुणे शहरामध्ये हिंजवडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत दि. १७/७/२०१८ रोजी पहाटे ०४/३० वाजता ते सकाळी ०७/३० वाजण्याच्या दरम्यान पुनावळे ब्रिजजवळ महिंद्रा एक्स यु व्ही गाडीतील चार इसमांनी १७ टन ७०० किलो बिफ असलेला टाटा ट्रक, ट्रक चालक यांच्याकडील रोख रक्कम असा मिळुन ४०,३५,०००/- रूपयांची जबरीची चोरी केल्याबाबत हिंजवडी पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आला होता,सदर गुन्हयांचा संमातर तपास वरिष्ठांच्या आदेशाने गुन्हे शाखेचे युनिट -२ हे पथक करीत होते.

युनिट २, गुन्हे शाखचे पोलीस निरीक्षक श्री.गजानन पवार यांना त्याच्या बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की, सदरचा गुन्हा हा धनाजी गायकवाड रा.कुर्डवाडी बार्शी याने व त्याच्या इतर ३ साथीदारांनी केला आहे. युनिट २ कडील अधिकारी व कर्मचारी यांची दोन वेगवेगळी पथके तयार करुन त्यापैकी पोलीस निरीक्षक श्री.पवार याचे पथक धनाजी गायकवाड याचे मुळ गाव मु.पो.वाकडी ता.परांडा जि.उस्मानाबाद या ठिकाणी व दुसरे पथक हिंजवडी,वाकड ,पिंपरी ,या भागामध्ये रवाना करण्यात आले होते.

पोलीस निरीक्षक श्री.गजानन पवार हे पथकासोबत असलेल्या संशयित धनाजी माने याचा शोध घेत असताना व तांत्रिक पध्दतीने माहीती प्राप्त करून आरोपी धनाजी गायकवाड याच्यासोबत गुन्हा करताना त्याचा साथीदार नामे बालाजी बापु वाघमारे वय २९ वर्ष रा.पटेल चौक कुर्डवाडी ता.बार्शी जि.सोलापुर हा असल्याचे निष्पन्न झाला.त्याचे वर नमुद पत्त्यावर शोध घेतला असता तो मिळुन आला. त्याच्याकडे गुन्हयातील ट्रकबाबत व त्याचे इतर साथीदार यांच्याबाबत तपास केला असता सदर गुन्हयाचा मुख्य सुत्रधार हा धनाजी गायकवाड हाच असल्याची माहीती प्राप्त झाली.आरोपी धनाजी गायकवाड याने सदरचा गुन्हा हा त्याचा पुणे येथील हिंजवडी परिसरात राहणारा त्याचा मित्र मौहम्मंद जब्बार सय्यद रा.विनोद वस्ती वाकड पुणे याचेसह केल्याचे निष्पन्न झाल्याने दुसरे पथकास त्याबाबत माहीती देवुन मौहम्मंद जब्बार सय्यद यास ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदर गुन्हयातील चोरून नेलेला ट्रक हा बिफसह पुणे सासवड रोड फुरूसुंगी या ठिकाणचे पार्कीगमध्ये मोठया ट्रकच्या आडबाजुला लपवुन ठेवुन त्यामध्ये असलेले मटण विकण्यासाठी धनाजी गायकवाड हा गि-हाईक पाहत असल्याचे ताब्यात असलेला आरोपी बालाजी वाघमारे याने सांगितले.त्यावरून पोलीस पथक रवाना करून गुन्हयातील चोरून नेलेल्या ट्रकचा शोध घेतला असता सदरचा ट्रक मिळुन आल्याने तो ताब्यात घेण्यात आलेला आहे.सदर वर नमुद आरोपीकडुन गुन्हयांतील चोरीस गेलेल्या मालापैकी बिफ मटणासह असलेला ट्रक किमंत रूपये ४०,३५,०००/- रूपयांचा आरोपीकडुन हस्तगत करण्यात आलेला आहे.गुन्हयातील मुख्य सुत्रधार धनाजी गायकवाड,सारंग गवळी हे फरार असुन त्यांचा शोध सुरू आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री प्रदीप देशपांडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री पंकज डहाणे, सहा पोलीस आयुक्त, श्री.समीर शेख यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक गजानन पवार,सपोनि जयवंत जाधव, सहा.पो.फौज शेखर कोळी, पो.हवा दिनेश गडांकुश,अस्लम पठाण,राजू केदारी, किरण पवार,अजय खराडे ,सिराज शेख पो.ना किशोर वग्गु,अतुल गायकवाड ,विशाल भिलारे,पो.शि.प्रसाद जंगीलवाड,अजित फरांदे गणेश नरुटे याच्या पथकाने केलेली आहे.

